**<u>नि.दि.दा.क्र. ७९/२०२५ मधील नि.क्र. ३४ वरील आदेश</u>**

**शिवाजी पाटील वि. वसंत पाटील व.५**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व ३/३ यांनी विना लेखी कैफियत व विना म्हणणे झालेला हुकुम रद्द करून लेखी कैफियत व विना म्हणणे स्विकारण्याची परवानगी मिळण्याबाबत सादर केलेला आहे.

२. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, प्रस्तूतचा दावा वादीने जून्या कागदपत्राआधारे दाखल केला असल्याने आणि महत्वाची जुनी कागदपत्रे काढण्याकरीता प्रतिवादीला विलंब झाल्याने मुदतीत जबाबदावा दाखल करता आलेला नाही. तसेच प्रतिवादींनी यापूर्वी आदेश ७ नियम ११ प्रमाणे दिलेल्या अर्जावर सुनावणी झाल्यामुळे प्रतिवादींना कैफियत दाखल करण्यास १५ दिवसांचा विलंब झालेला आहे. यातील प्रतिवादी क्र. १ व ३/३ यांना म्हणणे दाखल होणे कायद्याने क्रमप्राप्त आहे. तसे झाले नाही तर नैसर्गिक न्याय तत्वाप्रमाणे सदर दावा गुण दोषावर चालून निकाल होण्यास कायदेशीर अडचण निर्माण होणार असल्याचे कथन त्यांनी केले आहे. याउलट प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणार असून सदरचा दावा गुणदोषावर चालुन निकाल होणार आहे. त्यामुळे झालेला विलंब माफ करुन विना कैफियत व विना म्हणणे झालेला आदेश रद्द करुन कैफियत व म्हणणे दाखल करुन घेणेस परवानगी मिळावी असे कथन करून अर्ज मंजुर

करण्याची विनंती केली.

३. प्रस्तुत अर्जावर वादी यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र. ३५ वर दाखल करुन अर्जतील कथने नाकारली आहेत. वादी यांचे म्हणणे की, प्रतिवादी यांनी वादी यांना मुद्दाम त्रास देण्याच्या हेतूने व सदरचा दावा लांबविण्याच्या हेतूने दाव्यास कैफियत व ताकीद अर्जास म्हणणे दिलेले नाही. सबब सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली. यदा कदाचित अर्ज मंजूर करण्याचा निष्कर्षाप्रत मे. कोर्ट आलेस प्रतिवादी यांना जास्तीत जास्त कॉस्ट करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादींतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांचे अर्ज व म्हणण्याप्रमाणे युक्तिवाद केलेला आहे. निसर्गन्याय तत्वानुसार दोन्ही बाजुंचे म्हणणे आवश्यक आहे. सदर दाव्यात प्रतिवादी लेखी कैफियत दाखल करीत आहेत. लेखी कैफियत अभिलेखावर घेतल्यास सदर दाव्याचा गुणानुगुणावर निपटारा होण्यास सदर लेखी कैफियत अभिलेखावर घेतल्याने मदतच होणार आहे. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. पण लेखी कैफियत अभिलेखावर न घेतल्यास प्रतिवादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. प्रतिवादीने लेखी कैफियत व म्हणणे देण्यास केलेल्या उशीरामुळे वादीस झालेल्या त्रासाची भरपाई काही रक्कम वादीना देवुन करता येईल. सबब, वरील कारणाचा विचार करुन खालील आदेश पारीत करण्यात येतात.

## आदेश

१. अर्ज नि.क्र. ३४ मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ व ३/३ विरूध्दचा विना लेखी कैफियत व विना म्हणणे आदेश रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादींनी, झालेल्या विलंबापोटी, वादीस रक्कम रु. २००/– (रु दोनशे फक्त ) पुढील तारखेपर्यंत दयावेत.

MAHESH ARVINDRAO KULKARNI

Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2025.12.23 10:52:15 +0530

(एम. ए.कुलकर्णी)

दि. २२.१२.२०२५

सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर),
कवठेमहांकाळ.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| | | |
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 22.12.2025 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 22.12.2025 |
| Order /judgment uploaded on | : | 23.12.2025 |